
# स्फूट ज्योतिष.



किंमत ४० पैसे

कि. १ आणा.

श्री.

# स्फूट ज्योतिष.

## अमृतसिद्धियोग.

॥ श्लोक ॥ आदित्यहस्तेगुरुपुष्ययोगेबुधा-
नुराधा शनिरोहिणीच ॥ सोमेच सौम्यंभृगु-
रेवतीनां भौमाश्विनीचामृतसिद्धियोगः ॥ १ ॥

अर्थः—आदितवारीं हस्त, गुरुवारीं पुष्य, बुधवारीं अनुराधा, शनिवारीं रोहिणी, सोमवारीं सौम्य म्हणजे मृग, ( कोणी श्रवणहि घेतात. ) शुक्रवारीं रेवती, मंगळवारीं अश्विनी. या वारीं हीं नक्षत्रें आलीं म्हणजे अमृतसिद्धियोग जाणावा.

## वर्ज्य अमृतसिद्धियोग.

गुरुपुष्यविवाहेचप्रयाणेशनिरोहिणी ॥
भौमाश्विनीप्रवेशेचषण्मासैर्मरणंध्रुवम् ॥ २ ॥

अर्थः—गुरुवारीं पुष्यनक्षत्र आलें असतां अमृतसिद्धियोग खरा, परंतु विवाह केला असतां ६ महिन्यांनीं उभयतांस मृत्यु, शनिवारीं रोहिणी असतां प्रयाण केलें तर मृत्यु, मंगळवारीं अश्विनी असतां गृहप्रवेश केला तर षण्मासांनीं मृत्यु जाणावा.

मृत्युयोग.

त्यजरविमनुराधाउत्तराषाढचंद्रे शतभिषम-
पिभौमे चांद्रजेचाश्विनीच ॥ मृगशिर
गुरुवारेसार्पदैवंचशुक्रे रविसुतमपिहस्तेमृत्यु-
योगावदंति ॥ ३ ॥

अर्थः—रविवारीं अनुराधा, सोमवारीं उत्तराषाढा, मंगळवारीं शततारका, बुधवारीं अश्विनी, गुरुवारीं मृगशिर, शुक्रवारीं आश्लेषा, शनिवारीं हस्त. या वारीं हीं नक्षत्रें आलीं असतां मृत्युयोग जाणावा. तो सर्व कर्मास वर्ज्य.

दग्धयोग.

बुधतृतीयाकुजपंचमीचषष्ठ्यांगुरौचाष्टमि-
शुक्रवारे ॥ एकादशीसोमशनिर्नवम्यांद्वादश्य-
र्काइतिदग्धयोगः ॥ ४ ॥

अर्थः—बुधवारीं तृतीया, मंगळवारीं पंचमी, गुरुवारीं षष्ठी, शुक्रवारीं अष्टमी, सोमवारीं एकादशी, शनिवारीं नवमी, रविवारीं द्वादशी. याप्रकारें योग आला म्हणजे दग्धयोग जाणावा.

यमघंटयोग.

मवार्कवारेशशिनेविशाखा आर्द्राकुजेंदोश्व-
सुतेचमूलम् ॥ वह्निर्गुरौशुक्रदिनेचमैत्रंहस्तंच
सौरेयमघंटयोगः ॥ ५ ॥

अर्थः–रविवारीं मघा, सोमवारीं विशाखा, मंगळवारीं आर्द्रा, बुधवारीं मूळ, गुरुवारीं कृत्तिका, शुक्रवारीं अनुराधा, शनिवारीं हस्त. याप्रमाणें योग आला म्हणजे यमघंटयोग जाणावा.

योगफल.

यमघंटेगतेमृत्युः कुलक्षयकरोगृहे ॥
कृतेमृत्युप्रतिष्ठायांशिशुर्जातोनजीवति ॥ ६ ॥

अर्थः–यमघंटावर गमन केलें तर मरेल, गृहप्रवेश केला तर कुलक्षय होईल, कांहीं देवादिक स्थापना केल्यास मरण होय, उपजलेलें बालक मरेल असें जाणावें.

प्रयाणास उक्त नक्षत्रें.

अश्विन्यांमैत्ररेवत्यांमृगमूलपुनर्वसु ॥
पुष्यश्रवणतोहस्तप्रस्थानेकीर्तितंशुभम् ॥ ७ ॥

अर्थ–अश्विनी, अनुराधा, रेवती, मृग, मूळ, पुनर्वसु, पुष्य, श्रवण, हस्त हीं नक्षत्रें प्रयाण करण्यास योग्य जाणावीं.

मृगाश्विनीपुष्यपुनर्वसूचहस्तानुराधाश्रवणंचमूलम् ॥ धनिष्ठरेवत्यकृतप्रयाणं कार्यंलभेच्छीघ्रपुनर्गमंच ॥ ८ ॥

अर्थः—मृग, अश्विनी, पुष्य, पुनर्वसु, हस्त, अनुराधा, श्रवण, मूळ, धनिष्ठा, रेवती यांवर प्रयाण केलें असतां कार्य करून त्वरित घरीं येईल.

ध्रुवास्थिरनक्षत्र.

**उत्तरात्रयरोहिण्योभास्करश्चध्रुवंस्थिरम् ॥**
**तत्रस्थिरंबीजगेहशांत्यारामादिसिद्धये ॥ ९ ॥**

अर्थः—३ उत्तरा म्हणजे उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, रोहिणी, भास्कर म्हणजे सूर्यवार हीं ध्रुवस्थिर संज्ञक नक्षत्रें जाणावीं. यांवर घरें, देवळें, अनेक सुखासनें यांचा आरंभ केल्यानें सुखप्राप्ति होईल.

**मघामृगशिरोहस्तस्वातीमूलानुराधयोः ॥**
**रोहिणी रेवतीचैवउत्तराणांत्रयंतथा ॥ १० ॥**
**आवाहेचविवाहेचकन्यासंवरणेतथा ॥ वापये-**
**त्सर्वबीजानि गृहंग्रामंप्रवेशयेत् ॥ ११ ॥**

अर्थः—मघा, मृगशिर, हस्त, स्वाती, मूळ, अनुराधा, रेवती, रोहिणी, तीन उत्तरा हीं नक्षत्रें कोणत्याहि शुभ कार्यांचे आरंभास अथवा विवाहास किंवा कन्या वरण्यास अथवा शेतांत बीज करण्यास किंवा कांहीं वस्तुसंग्रह करण्यास, गृहप्रवेश किंवा ग्रामप्रवेश करण्यास प्रशस्त धरिलीं आहेत असें जाणावें.

चरचलनक्षत्रें.

स्वातीपुनर्वसूचैवधनिष्ठाश्रवणेतथा ॥
नक्षत्रंचशतभिषक्चरचलानिसंज्ञकम् ॥ १२ ॥

अर्थः—स्वाती, पुनर्वसु, श्रवण, धनिष्ठा, शततारका हीं चर चल संज्ञक नक्षत्रें जाणावीं.

अंध नक्षत्रें.

अंधाक्षंचपिंटाक्षंचकाणाक्षोदिव्यलोचनः ॥
गणनाद्रोहिणीचैवसप्तवारमनुक्रमात् ॥ १३ ॥
अंधकंतदनुमंदलोचनंमध्यलोचनमतःसुलोचनम् ॥ रोहिणीप्रभृतिभंचतुष्टयंसाभिजिच्चगणयेत्पुनःपुनः ॥ १४ ॥

अर्थः—रोहिणी अंध, मृगशीर्ष मंद, आर्द्रा मध्यलोचन, पुनर्वसु सुलोचन याप्रमाणें २८ नक्षत्रें अभिजितूसह गणावीं. तें अभिजित् उत्तराषाढा पुढें गणून नंतर श्रवण धनिष्ठादिक गणावीं म्हणजे अठ्ठावीस होतात, याप्रमाणें पहावें.

उग्रक्रूरलघुक्षिप्रनक्षत्रें.

मघाआदिचतुर्हस्तंभरणीउग्रक्रूरकम् ॥
लघुक्षिप्राणिपुष्याणिअश्विनीहस्तसंज्ञकम् १५

अर्थः—मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, भरणी हीं नक्षत्रें उग्रक्रूर आणि पुष्य, अश्विनी, हस्त हीं नक्षत्रें लघुक्षिप्र जाणावीं.

ध्रुवस्थिर मृदुमैत्र नक्षत्रें.

रोहिणीचध्रुवंस्थिरंउत्तराणित्रिगण्यते ॥
चित्रानुराधारेवत्यामृदुमैत्रंचजायते ॥ १६ ॥

अर्थः—रोहिणी, तीन उत्तरा, चित्रा, अनुराधा, रेवती हीं नक्षत्रें ध्रुवस्थिर मृदुमैत्र जाणावीं.

तीक्ष्णदारुण नक्षत्रें.

आरद्राचतथाज्येष्ठामघामूलंचविद्यते ॥
आश्लेषाणिचपूर्वाणिइत्येतेतीक्ष्णदारुणे॥१७॥

अर्थः—आर्द्रा, ज्येष्ठा, मघा, मूळ, आश्लेषा, पूर्वा हीं नक्षत्रें तीक्ष्ण दारुण संज्ञक होत.

धान्य मर्दनास वार.

रविर्दशांशोहिमरश्मिषोडशोबुधस्तृतीयो-
शनिरष्टभागः ॥ धरासुतोद्वादशभागहारोन-
भागहारोगुरुशुक्रवारे ॥ १८ ॥

अर्थः—रविवारीं अंश १०, सोमवारीं १६, बुधवारीं ३, शनिवारीं ८, मंगळवारीं १२ याप्रमाणें धान्य कमी होईल. गुरुवारीं व शुक्रवारीं मळणी काढून धान्य मोजलें असतां भाग जात नाहीं. यास्तव चांगली दिनशुद्धि पाहून मळणी करावी.

गमनास वर्ज्य नक्षत्रें.

त्रीणिपूर्वामघाज्येष्ठाभरणीजन्मकृत्तिका ॥
सार्पस्वातीविशाखार्द्राचित्रागमनवर्जयेत् १९

अर्थः—तीन पूर्वा, मघा, ज्येष्ठा, भरणी, आपलें जन्मनक्षत्र, कृत्तिका, आश्लेषा, स्वाती, विशाखा, चित्रा ह्या नक्षत्रीं कधींहि गमन करूं नये.

गांवास गेलेला तो कधीं येईल त्याचा प्रश्न.

तिथिप्रहरसंयुक्तंतारकावारमिश्रितं ॥
सप्तभिस्तुहरेद्भागंशेषंचफळमादिशेत् ॥ २० ॥
फलम् ॥ एकेनतत्रसंस्थाप्यद्वाभ्यामागम्यते-
सुखम् ॥ तृतीयंचार्धमार्गस्याच्चतुर्थेग्रामसन्निधौ
॥ २१ ॥ पंचमेपुनरावृत्तिःषष्ठेव्याधिसमुद्भवः॥
शून्यंशून्यंविजानीयात्पंथाप्रश्नस्यलक्षणम् २२

अर्थः—शुक्लपक्षींच्या प्रतिपदेपासून वर्तमान तिथिपर्यंत तिथि गणाव्या आणि सूर्योदयापासून तत्काळ जे प्रहर झाले असतील ते मिळवावे आणि दिवसनक्षत्रांची संख्या मिळवून रविवारपासून वारांचीहि संख्या मिळवावी आणि त्या एकंदर संख्येला सातांनीं भाग देउन जे अंक राहतील त्याचा प्रश्न पहावा. १ उरला तर त्याच ठिकाणीं आहे. २ उरले तर सुखें करून येत आहे. ३

उरले तर मार्गीत आहे. ४ उरले तर आपले गांवाचे आसपास आला आहे. ५ उरले तर फिरून माघारा गेला. ६ उरले तर कांहीं आजारामुळें क्लेश पावत आहे आणि जर बरोबर भाग सुटला तर येत नाहीं म्हणून सांगावें.

### घबाड मुहूर्त.

**सूर्यभाद्गणयेच्चांद्रंत्रिगुणंतिथिमिश्रितम् ॥**
**सप्तभिस्तुहरेद्भागंत्रीणिशेषेघबाडकम् ॥ २३ ॥**

अर्थः—महानक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून जी संख्या येईल, तिला तिहींनीं गुणावें व त्यांत शुक्ल प्रतिपदेपासून विद्यमान तिथीपर्यंत तिथि मिळवून एकंदर संख्येस ७ नीं भाग द्यावा. ३ शेष राहिले तर त्या दिवशीं घबाड मुहूर्त आहे असें जाणावें. तो सर्व व्यापारास योग्य होय.

### आडळ भ्रमण.

**सूर्यभाद्गणयेच्चांद्रंसप्तभिर्भागमाहरेत् ॥**
**त्रिषट्केभ्रमणंप्रोक्तंद्विशून्यमथचाडळम् ॥२४॥**

अर्थः—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून ७ नीं भागावें. ३ किंवा ६ राहिले तर भ्रमण. २ अथवा शून्य आलें तर आडळ जाणावें. भ्रमण पशुकर्मास व आडळ स्थावरास घ्यावें.

चतुष्पाद घ्यावयास मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंसप्तभिर्भागमाहरेत् ॥ चत्वा-
रोऽभ्यंतरेज्ञेयास्त्रीणिबाह्यःप्रकीर्तिताः ॥२५॥

अर्थः—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून जी संख्या येईल ती ७ नीं भागावी. शेष राहील त्याचा क्रम आंत ४ बाहेर ३; याप्रमाणें आंत बाहेर चाल बघून पश्वादिकांचा संग्रह करावा. आंतले चालीवर आणिलें असतां राहील व बाहेर चालीवर आणलेलें जाईल.

शेतांत नांगर धरावयास मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंतिथिवारसमन्वितम् ॥
नवभिस्तुहरेद्भागंसप्तशेषंतुहैवरम् ॥ २६ ॥

अर्थः—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून विद्यमान तिथि व वार मिळवून ९ नीं भाग द्यावा आणि शेष ७ राहिले तर हैवर म्हणावें. हैवरावर शेतांत नांगर जुंपावा.

पालखारोहणास मुहूर्त.

सूर्यभाद्गणयेच्चांद्रंपंचपंचतुर्दिशम् ॥
मध्येसप्तप्रदेयानिपालखंचक्रलक्षणम् ।२७।

अर्थः—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून पूर्वेपासून ४ दिशांस पांचपांच नक्षत्रें घेऊन मध्यें ७ द्यावीं म्हणजे २७ झालीं. ज्या दिशेस भाग पुरेल तें फळ पालखारोहणाचें जाणावें.

फलश्लोक.

पूर्वंभवतिचारोग्यंदक्षिणेमरणंध्रुवम् ॥
पश्चिमेकृशबालंचह्युत्तरेव्याधिसंभवः २८॥
मध्येसत्ततुआयुष्मान्पालखेशयनंसुखी ॥२९॥

अर्थः—पूर्वभागीं आरोग्य, दक्षिणेस मरण होय, पश्चिमेस कृशांग, उत्तरेस व्याधी होय, मध्यें आयुष्मान् होय.

शशितुरगधनिष्ठारेवतीपुष्यचित्राशतभिषगनुराधात्र्युत्तरास्वातिहस्ताः ॥ शुभग्रहगुरुलग्नेबालकंचेत्रषष्ठेधनकनकसमृद्धिंपालखंबंधनंस्यात् ॥ ३० ॥

अर्थः—मृग, अश्विनी, धनिष्ठा, रेवती, पुष्य, चित्रा, शततारका, अनुराधा, तिन्ही उत्तरा, स्वाती, हस्त हीं नक्षत्रें पालखारोहणाचीं. यांस ग्रहबळ, शुभग्रह, गुरु लग्नीं असावा आणि तीन सहा असे पापग्रह असावे, तर पालखारोहणगृहीं धनकनकसमृद्धि होईल.

अग्नि कोठें आहे तो पहाणें.

सैकातिथिर्वारयुताकृताप्ताशेषेगुणेभ्रेभुविवन्हिवासः ॥ सौख्यायहोमेशशियुग्मशेषेप्राणार्थनाशो दिविभूतलेच ॥ ३१ ॥

अर्थ—ज्या तिथीस पहाणें त्या तिथीपर्यंत शुक्लप्रतिपदादि तिथि गणून त्यांत १ अधिक मिळवावा आणि त्या दिवशीं जो वार असेल तोहि त्यांत मिळवून एकंदर संख्येस ४ नीं भागावें व शेष गुण म्ह. ३ व अभ्र म्हणजे शून्य आलें असतां पृथ्वीवर अग्नि आहे असें जाणावें. तो होमास योग्य. जर १ किंवा २ शेष राहिले तर आकाशीं व पाताळीं आहे. त्यावर होम केला तर प्राण व अर्थ यांचा नाश करील.

कोणत्या ग्रहाचे मुखीं आहुती.

तरणिविद्भृगुभास्करिचंद्रमाकुजसुरेज्यविधुंतुदकेतवः ॥ रविभतोदिनभंगणयेत्क्रमात्प्रतिखगांत्रितयांत्रितयंन्यसेत् ॥ ३२ ॥

अर्थः—सूर्यनक्षत्रापासून दिवसनक्षत्रापर्यंत मोजून सूर्यापासून क्रमानें प्रतिग्रहास तीन तीन नक्षत्रें दिल्यानें जेथें भाग पुरेल त्या ग्रहाचे मुखीं आहुती आली असें जाणावें.

शुभाशुभ फळ.

दिनकृदार्कितमःकुजकेतवोहुतभुजोनशुभाःशुभदाःशुभाः ॥ हवनचक्रमिदंप्रविलोक्यतांहवनकर्मणिसर्वसमृद्धये ॥ ३३ ॥

अर्थः—सूर्य, शनि, राहु, मंगळ, केतु या पांच ग्रहांचे मुखीं आहुती आली असतां हवनकर्त्यास अकल्याणका-

रक होय व चंद्र, बुध, शुक्र या चहूं ग्रहांचे मुखीं आहुती आली असतां उत्तम फळ प्राप्त होय. म्हणून अशा प्रकारें हवनचक्र पाहून अनेक प्रकारचा नैमित्तिक होम केल्यानें सुख होय.

अथ घातचतुष्टयं [ घातवार ].

मेषस्यार्कःसिंहकन्यावृषाणांमंदोद्वंद्वस्येंदुरारोमृगस्य ॥ कर्केसौम्येतौलिकुंभस्यजीवेचापार्यंते भार्गवःकालवारः ॥ ३४ ॥

अर्थः—मेष राशीचा घातवार रविवार, सिंह, कन्या, वृषभ यांचा शनिवार. मिथुनाचा सोमवार. मकराचा मंगळवार. कर्काचा बुधवार. तूळ, कुंभ यांचा गुरुवार, धन,वृश्चिक, मीन यांचा शुक्रवार. याप्रमाणें राशींचे घातवार जाणावें.

घाततिथि.

धनेमीनेद्वितीयाचचतुर्थीवृषकुंभयोः ॥ मेषकर्कटयोः षष्ठीकन्यामिथुनवाष्टमी ॥ ३५ ॥ दशमीवृश्चिकेसिंहेद्वादशीमकरेतुले ॥ एतास्युर्घाततिथ्यादिर्वर्जनीयाःप्रयत्नतः ॥ ३६ ॥

अर्थः—धन, मीन या दोनींची २; वृषभ, कुंभ यांची ४; मेष, कर्क ६; कन्या, मिथुन यांची ८; वृश्चिक, सिंह यांची १०; मकर, तूळ यांची १२; याप्रमाणें घाततिथि जाणाव्या.

घातनक्षत्रें.

मघाहस्तस्वात्यनुराधामूलश्रवणतारकाः ॥ रेवतीरोहिणीभरणीआर्द्राश्लेषाख्यघातकाः ३७

अर्थः—मेषाचें मघा, वृषभाचें हस्त, मिथुन स्वाती, कर्क अनुराधा, सिंह मूळ, कन्या श्रवण, तूळ शततारका, वृश्चिक रेवती, धन रोहिणी, मकर भरणी, कुंभ आर्द्रा, मीन आश्लेषा, याप्रमाणें घातनक्षत्रें जाणावीं.

घातचंद्र.

एकपंचनवयुग्मषट्दशत्रीणिसप्तचतुरष्टला-भकः ॥ द्वादशास्थितमजादिराशितो घातचंद्र इतिकथ्यते बुधैः ॥ ३८ ॥

अर्थः—मेष १ वृषभ ५ मिथुन ९ कर्क २ सिंह ६ कन्या १० तूळ ३ वृश्चिक ७ धन ४ मकर ८ कुंभ ११ मीन १२ याप्रमाणें ज्या राशीपुढें जो अंक आहे तो त्या राशीचा घातचंद्र जाणावा.

॥ फल ॥ एतानिमेषादिषुराशिघाततिथ्या-दिवाराणिचऋक्षचंद्रान् ॥ संग्रामयात्रानृपदर्श-नेचवर्ज्याञ्छुभेकर्मणिनात्रदोषः ॥ ३९ ॥

अर्थः—हे सांगितलेले चार प्रकारें घाताख्य, यांचा दोष कोणे ठिकाणीं पाहावा तो प्रकार, कज्जा करणें,

प्रयाण—परदेशीं गमन करणें, राजदर्शनास जाणें, हरएक युद्धसेवा प्रकरणीं वर्ज्य. शुभकर्मी यांचा दोष नाहीं असें जाणावें.

राशींचे स्वामी.

पंचाननेरविंविद्यात्सोमंकर्काटकेतथा ॥मेषवृश्चिकयाभौंमःकन्यामिथुनयोर्बुधः ॥ ४० ॥ गुरुर्धनुषिमीनेचतुलावृषभयोर्भृगुः ॥ शनिस्तुमकरेकुंभेराशीनामधिपाः स्मृताः ॥ ४१ ॥

अर्थः—सिंहींचा रवि. कर्कीचा चंद्र. मेष, वृश्चिक यांचा मंगळ. कन्या, मिथुन यांचा बुध. धन, मीन यांचा गुरु. तुळ, वृषभ यांचा शुक्र. मकर, कुंभ यांचा शनि. याप्रमाणें स्वामी जाणावे.

चंद्र कोणत्या दिशेस आहे तें पाहणें.

मेषेचसिंहेधनपूर्वभागेवृषेचकन्यामकरेचयाम्ये ॥ तूलेघटेमिथुनेपश्चिमायांकर्कालिमीनेदिशिचोत्तरायाम् ॥ ४२ ॥

अर्थः—मेष, सिंह, धन यांचा चंद्र पूर्वेस आहे. वृषभ, कन्या, मकर या राशींचा चंद्र दक्षिणेस. कुंभ, तूळ, मिथुन, यांचा पश्चिमेस. कर्क, वृश्चिक, मीन या राशींचा चंद्र उत्तरेस आहे. याप्रमाणें राशींचे चंद्र जाणावे.

॥ फल ॥ सन्मुखोह्यर्थलाभायदक्षिणेसुख-
संपदः ॥ पृष्ठेचमरणंयातेवामेचंद्रधनक्षयः ४३

अर्थः—सन्मुख चंद्र असतां प्रयाण व कांहीं कार्यारंभ केल्यास अर्थलाभ. दक्षिणेस असल्यास सुखसंपदा. पाठी-मागें असल्यास प्राणनाश करील व वामभागीं अस-ल्यास धनक्षय होईल. यास्तव चंद्र पाहून सर्व कार्यास आरंभ करावा.

चंद्र कोठें आहे तो पहाणें.

तिथिपंचगुणंकृत्वाकृत्तिकादिषुयोजयेत् ॥
ततोद्वादशभिर्युक्तंनवभिर्भागमाहरेत् ॥ ४४ ॥

अर्थः—ज्या तिथीस चंद्र पाहणें असेल त्या तिथीपर्यंत शुक्लपक्षादि तिथि गणून त्यांचे पांचपट करावें आणि त्यांत कृतिकापासून दिवसनक्षत्रापर्यंत गणून जी संख्या होईल तितकी मिळवून त्यांत १२ मिळवावे व एकंदर संख्येस ९ नीं भागावें आणि शेष अंक राहील त्यावरून चंद्र कोठें आहे हा निश्चय जाणावा.

एकंचतुःसप्तजलेद्विपंचवसुभिःस्थले ॥ त्रि-
षष्ठंनवमाकाशेचंद्रस्तात्कालिकोभवेत् ॥ ४५ ॥

अर्थः—१।४।७ शेष राहतील तर जळीं चंद्र आहे असें जाणावें व २।५।८ असे राहिले तर स्थळीं आहे व ३।६ ९ राहिले तर आकाशीं आहे असें जाणावें.

॥ फल ॥ जलेचलभतेशीघ्रंस्थलेकार्य-
विनश्यति ॥ आकाशेमध्यमप्रोक्तमेतच्चंद्रस्य-
लक्षणम् ॥ ४६ ॥

अर्थः—चंद्र जळीं असतां कार्यसिद्धि. स्थळीं असतां कार्यनाश. आकाशीं असतां मध्यम फळ जाणावें.

पंचक पहाणें.

गततिथ्यायुतलग्नेनवतेपंचकंक्रमाज्ज्ञेयम् ॥
मृतिरग्निनोनृपतिनोनोचोरोनोगदोनेति ॥४७॥

अर्थः—शुक्लपक्ष आदिकरून ज्यादिवशीं पंचक पहाणें त्याच्या पूर्व तिथीपर्यंत तिथि गणून ज्यावेळीं पहाणें त्यावेळींचें लग्नहीं त्यांत मिळवून एकंदर संख्येस ९ नीं भाग द्यावा आणि शेष अंक राहतील त्यांवरून पुढें सांगितल्याप्रमाणें पहावें. १ मृत्यु २ अग्नि ३ निष्पंचक ४ राजपंचक ५ निष्पंचक ६ चोरपंचक ७ निष्पंचक ८ रोगपंचक ९ निष्पंचक याप्रमाणें जाणावें.

॥ फल ॥ यानेचौरव्रतेरोगंगृहारंभेऽग्निपंच-
कम्॥ राजकंराजसेवायांमृत्युःसर्वत्रवर्जयेत् ४८

अर्थः—प्रयाणास चोरपंचक वर्जावें. व्रतबंधादि संस्कार कर्मास रोगपंचक वर्जावें. राजसेवेस राजपंचक वर्जावें. गृहारंभास अग्निपंचक वर्जावें आणि मृत्युपंचक सर्व कर्मास वर्ज करावें.

लग्न पाहण्याचा प्रकार.

मीनेमेषेचतुर्नाड्यःसार्द्धाश्चवृषकुंभयोः ॥
मिथुनेमकरेपंचशेषासार्धाप्रकीर्तिताः ।४९।

अर्थः—मीन व मेष हीं दोन लग्नें चार चार घटिका. वृषभ व कुंभ हीं २ लग्नें ४॥ घटिका. मिथुन व मकर हीं ५।५ घटिका. कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक व धन हीं ६ लग्नें ५॥, ५॥ घटिका याप्रकारें करून १२ लग्नें जाणावीं.

यांचा प्रतिदिवशीं भोगावयाचा प्रकार.

मीनेमेषेपलान्यष्टौनवकंवृषकुंभयोः ॥
मिथुनेमकरेदिक्चशेषारुद्राःप्रकीर्तिताः ५०

अर्थः—मीन व मेष हीं २ लग्नें संक्रांत जाहल्या दिवसापासून व प्रतिदिवशीं ८।८ पळें भोगून एका महिन्यांत संपतात. मग दुसरी संक्रांत लागते, तेव्हां तें लग्न सूर्योदयीं प्राप्त होतें. त्याचा क्रम अशा प्रकारें पहावा. वृषभ व कुंभ हीं दोन लग्नें ९।९ पळें भोगितात. मकर व मिथुन हीं दोन लग्नें दररोज १०।१० पळें भोगितात. कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धन हीं ६ लग्नें दररोज ११।११ पळें भोगितात. याप्रमाणें लग्नभोग जाणावें.

चतुष्पाद पशु देण्याघेण्यास मुहूर्त.

मंदेंदुज्ञदिनेषुमूलभरणीचित्रोत्तराणांत्रयंरो-
हिण्यांश्रवणाढळाष्टमितिथौबाह्यर्क्षरिक्ताति-

थौ ॥ भद्रासंक्रमसिंहलग्नकुलिकेपातेतथावैधृता-
र्वाद्रापौर्णिमयोश्चदर्शदिवसेगोकर्मनैवाचरेत् ५

अर्थः—शनि, सोम, बुध या दिवशीं अथवा नक्षत्रें वर्ज्यं आहेत तीं कोणत्याहि वारीं असतां, मूळ, भरणी, चित्रा, ३ उत्तरा, रोहिणी, श्रवण, आढळ चक्र बाहेर चाल, अष्टमी, रिक्तातिथि, भद्रा, संक्रांति, सिंहलग्न, कुलिक, व्यतीपात, वैधृति, आर्द्रा, पौर्णिमा, अमावास्या, यांवर गायी, म्हशी, शेळ्या, घोडे, मेंढ्या आदिकरून चतुष्पाद जनावरें घरीं आणूं नयेत.

इंदोमंदेसिंहलग्नेपशूनांनप्रवेशनम् ॥ सोमे-
लोमाबुधेगावोनचाल्यास्तुरगाःशनौ ॥ ५२ ॥

अर्थः—याचा भाव पूर्व श्लोकाचे अर्थांत सांगितला त्याप्रमाणें पाहून क्रयविक्रय करून नवीन आणणें व देणें तें करावें.

तिथींचीं लक्षणें.

नंदाभद्राजयारिक्तापूर्णात्र्यावर्तितातिथिः॥
शुक्लेऽधमाःसमाःश्रेष्ठाःकृष्णेःश्रेष्ठाःसमाधमाः
॥ ५३ ॥

अर्थः—प्रतिपदा नंदा, द्वितीया भद्रा, तृतीया जया, चतुर्थी रिक्ता, पंचमी पूर्णा या प्रकारेंकरून तीन क्रमांनीं

१५ तिथींचीं नांवें जाणावीं. शुक्लपक्षीं ज्या अधम त्या कृष्णपक्षीं श्रेष्ठ, ज्या कृष्णपक्षीं अधम त्या शुक्लपक्षीं श्रेष्ठ जाणाव्या.

कार्यविचारणा.

नंदासुचित्रोत्सववास्तुतंत्रक्षेमादिकुर्वीतत- थैवनृत्यम्॥ विवाहभूतंशकटाध्ययानेभद्रासुका- र्याण्यपि पौष्टिकानि ॥ ५४ ॥

अर्थः—चित्रें लिहावीं, घरें, माळवदें, उपरिया, सोपे, दुर्ग, देउळें, विहिरी, तळीं, अश्वशाळा, गजशाळा, आड, गाईचे वाडे, शेळ्यांचे वाडे, शेतें, अलाटीं, जिराठीं, हळद, मके, केळीं, ऊंस आदिकरून नाटकशाळा, शुभ कृत्यें, अलंकार, गाडे, रथ, पालखी हीं सकल कामें नंदातिथींस करावीं.

जया व रिक्ता तिथींस कोणतीं कर्मे करावीं तीं.

जयासुसंग्रामबलोपयोगिकार्याणिसिद्ध्यं- तिहिनिर्मितानि ॥ रिक्तासुविड्वीइतिबंधघा- तविषाऽग्निशस्त्रादिचयातिसिद्धिम् ॥ ५५ ॥

अर्थः—जया तिथीस उक्त कर्मे—चाकर, बटकी, गुलाम, रत्नें, मोत्यें, सोनें, रुपें, तांबें, कांच, चुडा, गाई, म्हशी, घोडे, उंट, बैल, गाडा, शेळी, मेंढी, वस्त्रें, घ्यावीं द्यावीं. रिक्ता तिथीसि घात, वात, वध, बंध, विषप्रयोग, जळित- मार, शस्त्रें, लोखंड, दुष्ट कृत्यें, उग्र कृत्यें हीं करावीं.

पूर्णातिथीस काय करावें तें.

पूर्णासुमांगल्यविवाहयात्रासपौष्टिकंशांतिकर्मकार्यम् ॥ सदैवदेशेपितृकर्मह्युक्तंनान्यंविदध्याच्छुभमंगलादि ॥ ५६ ॥

अर्थः—पूर्णातिथीस मंगलकार्यें विवाहादिक व यात्रा पौष्टिक म्हणजे अनेक प्रकारें ग्रहमखादि शांति करावी आणि अमावास्येस पितृकर्मैं मात्र उक्त. अन्य सर्व कर्मैं वर्ज्य.

वारांचीं फळें.

राज्याभिषेकोत्सवयानसेवागोवह्निमंत्रौषधशस्त्रकर्म ॥ सुवर्णताम्रोर्णवपण्यकर्मकाष्ठंचसंग्रामरवौविदध्यात् ॥ ५७ ॥

अर्थः—राज्याभिषेक, अनेक उल्हास कृत्यें, सेवाकर्म, पशुकर्म, मंत्रोपदेश, अनेक औषधी साधन, शस्त्रकर्म, सुवर्ण, तांबें, कंबलादि व्यापार म्ह० अनेक प्रकारचीं दुकानें, काष्ठसंग्रह व कलह, संग्राम हीं कर्में रविवारीं करावीं.

सोमवारीं कोणतीं कृत्यें करावीं.

शंखाब्जमुक्तारजतेक्षुभोज्यस्त्रीवृक्षकृत्यंतुविभूषणाद्यम् ॥ गीताक्रतुक्षीरविकारश्रृंगीपुष्पांबरारंभणमिंदुवारे ॥ ५८ ॥

अर्थः-शंखाचे अलंकार, उदककर्में, मोत्यें, रुपें, ऊंस लावावे, स्त्रीभोग, वृक्षारोहण, भूषणें, मळे, बागाईत, पुष्पांचीं आभरणें, शेज, गायनकला, यज्ञक्रिया, अंबरें हीं सर्व कृत्यें चंद्रवारीं करावीं.

भौमवारीं कोणतीं कृत्यें करावीं.

भेदानृतस्नेहविषाग्निशस्त्रबंधाभिघाताहव-
शाठ्यदंभान् ॥ सेनाविवेकाकरधातुहेमप्रवाल-
कार्यादिकुजेविदध्यात् ॥ ५९ ॥

अर्थः-अनेक प्रकारें भेद, फितुर, खोटें कर्म, विषप्रयोग, अग्निकृत्यें, शस्त्रघात, बंधनादि प्रकार, अनेक घातकर्में, शठत्वकर्में, दंभ, अहंकार, सेनेंत प्रवेश, सुवर्ण आणि पोंवळें यांचा व्यापार इतकीं कृत्यें मंगळवारीं करावीं.

बुधवारीं कोणतीं कृत्यें करावीं.

नैपुण्यपण्याध्ययनंकलाश्चाशिल्पादिसेवालि-
पिलेखनानि ॥ धातुक्रियाकांचनयुक्तिसंधि-
व्यायामवादाश्चबुधेविधेयाः ॥ ६० ॥

अर्थः-अनेक विद्यांचा निपुण अभ्यास करणें व नानाप्रकारचे व्यापार करणें, अध्ययन करणें, नानाप्रकारची कुशलता करणें, सुतारकाम, लेखनविद्या, सर्व प्रकारचें शिकणें, धातुक्रिया, अनेक युक्ति, संधिप्रकार, स्वारीस जाणें व येणें, अनेक वादविवाद हीं कर्में बुधवारीं करावीं.

गुरुवारीं कोणतीं कृत्यें करावीं.

धर्मक्रियापौष्टिकयज्ञविद्यामांगल्यहेमांबर-
वेश्मयात्रा ॥ रथाश्वभैषज्यविभूषणादिकार्यंवि-
दध्यात्सुरमंत्रिवारे ॥ ६१ ॥

अर्थः—अनेक प्रकारचे धर्म करणें, औषधें, पौष्टिकें, यज्ञादिक कर्मे, विद्याभ्यास, मंगलकृत्यें, सुवर्णाचे अलंकार व अनेक प्रकारचीं नवीन वस्त्रें धारण करणें, गृहप्रवेश करणें, यात्रेस जाणें, रथावर बसणें, घोड्यावर बसणें, औषध घेणें, भूषणें धारण करणें हीं कर्मे गुरुवारीं करावीं.

शुक्रवारीं कोणतीं कृत्यें करावीं.

स्त्रीगीतशय्यामणिरत्नयोग्यवस्त्रोत्सवालंक-
रणादिकर्म ॥ भूपण्यगोकोशकृषिक्रियाश्चसि-
द्ध्यंतिशुक्रस्यदिनेसमस्ताः ॥ ६२ ॥

अर्थः—स्त्रीभोग, गायनकला, शय्या, हिरे, रत्नें, नानावस्त्रें, अलंकार, भूषणें, गायी म्हशींचा संग्रह, द्रव्यसंग्रह, शेतांचीं कामें हीं सर्व कृत्यें शुक्रवारीं केल्यानें लाभदायक होतील.

मंदवारीं कोणती कृत्यें करावीं.

लोहाश्मसीसेत्रपुशस्त्रदासपापानृतंस्तेहवि-
षासवाद्यम् ॥ गृहप्रवेशोविषबंधदीक्षास्थिरंच-
कर्मार्कसुतेविदध्यात् ॥ ६३ ॥

अर्थः–लोखंड व शिसें यांचीं कृत्यें, दासदासींचा संग्रह, अनेक पापकर्में, स्नेहकर्म, विषकृत्यें, वाद्यें, गृह-प्रवेश, बंधनादि कर्में, स्थिरकर्मादि, दीक्षा हीं कृत्यें मंदवारीं करावीं.

कोणत्या नक्षत्रीं कोणतें कार्य करावें.

**रोहिणीसहितमुत्तरात्रयंकीर्तयंतिमुनयोध्रु-वाह्वयम् ॥ बीजहर्म्यनगराभिषेचनारामशांति-कहितंस्थिरेषुच ॥ ६४ ॥**

अर्थः–रोहिणी, तिन्ही उत्तरा, हीं ध्रुवनक्षत्रें, यांवर बीजें पेरावीं. गृह, ग्राम प्रवेश करावा, बीज संग्रह करावा. आराम जागा निर्माण करावी. एवं सर्व स्थिर कर्में करावीं.

मृदुनक्षत्रीं कोणतीं कृत्यें करावीं.

**त्वष्ट्रामित्रशशिपूषदैवतान्यामनंतिमुनयोमृ-दुन्यथ ॥ मित्रकार्यरतिपूषणांबरंगीतमंगलवि-धानमेवच ॥ ६५ ॥**

अर्थः–चित्रा, अनुराधा, मूळ, रेवती हीं मृदुमिश्र नक्षत्रें, यांवर मित्रत्व, रतिभोगविलास, नानाभूषणें धारण, नानावस्त्रें ग्रहण, गायन मंगलकार्यें करावीं.

लघुनक्षत्रीं कोणतीं कृत्यें करावीं.

**अश्विनीगुरुभमर्कदैवतंसाभिजिल्लघुचतुष्ट-**

यंमतम् ।। पण्यभूषणकलारतौषधीज्ञानशिल्पग-
मनेषुसिद्धिदम् ।। ६६ ।।

अर्थः—अश्विनी, पुष्य, हस्त, अभिजित् हीं चार लघु-नक्षत्रें. यांवर दुकानदारी, अनेक भूषणें, नाना कला, अनेक भोग, औषधीसेवन, सुतारकामाचा अभ्यास हीं कर्में करावीं.

चरनक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

वैष्णवत्रययुतःपुनर्वसुमारुतंचचरपंचकंत्वि-
दम् ।। दंतिवाजिखरभोष्ट्रवाहनारामयानवि-
धिषुप्रशस्यते ।। ६७ ।।

अर्थः—श्रवण, धनिष्ठा, शततारका, पुनर्वसु, स्वाती हीं ५ नक्षत्रें चर. यांवर अनेक वाहनांवर आरोहण करावें व अनेक बागबगीचे, आराम, वनें अशांमध्यें प्रवेश करावा.

उग्र नक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

पूर्विकात्रितयमंतकंमघेत्युग्रपंचकमिदंजगु-
र्बुधाः ।। शाठ्यनाशविषघातबंधनोच्छेदशस्त्रद-
हनादिषुस्मृतम् ।। ६८ ।।

अर्थः—तीन पूर्वा, भरणी, मघापंचक हीं नक्षत्रें उग्र. यांवर शठत्व, विषघातादि प्रयोग, मारण, शस्त्रकर्म, अग्नि लावणें इत्यादि कर्में करावीं.

मिश्रनक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

हव्यवाहभयुतंद्विदैवतंमिश्रसंज्ञमथमिश्रकर्म-
सु ॥ साभिधानसमकार्यसाधनेकीर्तितानिसु-
खकारिभिःसदा ॥ ६९ ॥

अर्थः—कृत्तिका, विशाखा हीं दोन नक्षत्रें मिश्रसंज्ञक. यांवर मित्रता, शिष्टाई, अग्निकृत्यें व साधारण कार्यें करावीं.

तीक्ष्णनक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

मूलशक्रशिवसार्पदैवतान्युल्पंत्यथचतीक्ष्ण-
संज्ञया ॥ भूतयक्षविधिमंत्रसाधनंभेदबंधवध-
कर्मचात्रतु ॥ ७० ॥

अर्थः—मूळ, ज्येष्ठा, आर्द्रा, आश्लेषा हीं तीक्ष्णदारुण नक्षत्रें. यांवर भूत यक्षादिक मंत्रसाधनें व भेदबंधनें हीं करावीं.

कोणते करणावर कोणतीं कृत्यें करावीं.

बवबालवकौलवतैतिलगरवणिजाविष्टयः-
सप्त ॥ शुक्लप्रथमोर्ध्वदलादिषुचाष्टावृत्त्याचला-
निकरणानि ॥ ७१ ॥ शकुनिचतुष्पदनागाः
किंस्तुघ्नाख्यचचत्वारि ॥ वदिभूतोर्ध्वदलासितः
प्रथमाद्यादलावधिस्थिराणिस्युः ॥ ७२ ॥

अर्थः—बवादि अकरा करणांचीं नांवें अनुक्रमें—बव, बालव, कौलव, तैतिल, गर, वणिज, विष्टि, शकुनी, चतुष्पाद, नाग, किंस्तुघ्न; एवं ११ आहेत. त्यांचा क्रम शुक्लपक्ष प्रतिपदेचे पूर्वदळीं किंस्तुघ्न करण आणि उत्तरदळीं बव. द्वितीयापूर्वदळीं बालव उत्तरदळीं कौलव. तृतीया पूर्वदळीं तैतिल. उत्तरदळीं गर. चतुर्थी पूर्वदळीं वणिज, उत्तरदळीं विष्टि. एवं अष्टावृत्ति. वद्य चतुर्दशी उत्तरदळीं शकुनी, अमावास्या पूर्व उत्तरदळीं चतुष्पाद, नाग, शुद्ध १ किंस्तुघ्न एवं चार ध्रुवकम्.

**पौष्टिकंस्थिरचराणिबवाख्येबालवेनिजहितान्यपीधमःकौलवेप्रमदामित्रविधानंतैतिलेशुभगताश्रयकर्म ॥ ७३ ॥**

अर्थः—स्थिरचर कर्मै बवकरणीं करावीं. बालवकरणीं स्वहित. कौलवीं स्त्रीसमागम प्रीति, तैतिलीं शुभगत आश्रय कर्म करावें.

**गरेतुबीजाश्रयकर्मचोक्तंवाणिज्यकेस्थैर्यवणिक्क्रियाश्च ॥ नासिद्धिमायांतिकृतानिविष्ट्यांविषाग्निशस्त्रादिचयातिसिद्धिम् ॥ ७४ ॥**

अर्थः—गर करणीं बीजाश्रय कर्म करावें, वणिज करणीं वाणिज्य म्ह० व्यापार व स्थिर कर्मै करावीं. विष्टिकरणीं कृत्यें करूं नयेत, पण विष, अग्नि शस्त्रकर्मै करावीं.

मंत्रौषधानिशकुनौचसपौष्टिकानि गोविप्र-राज्यपितृकर्मचतुष्पदेतु ॥ सौभाग्यदारुणहृतीध्रुवकर्मनागोकिंस्तुघ्ननाम्निशुभपौष्टिकमंगलानि ॥ ७५ ॥

अर्थः—शकुनिकरणीं मंत्रौषधी कर्मे करावीं. गाय, ब्राह्मण, राजसेवा, पितृकर्मे, चतुष्पादकरणीं करावीं. नागकरणीं सौभाग्य हरणादिक दारुणकर्मे करावीं. किंस्तुघ्नकरणीं शुभमंगल स्थिर कर्मे करावीं.

अधोमुख नक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

मूलाग्नेयमघाद्विदैवभरणीसार्पाणिपूर्वात्रयं-ज्योतिर्विद्भिरधोमुखंतुनवकंभानामिदंकीर्तितम् ॥ वापीकूपतडागगर्तपरिधिन्खातोनिधेरुद्धृतिक्षेपोद्यूतबिलप्रवेशगणितारंभाःप्रसिद्ध्यंतिच ॥ ७६ ॥

अर्थः—मूळ, कृत्तिका, विशाखा, भरणी, आश्लेषा, तीन पूर्वा हीं अधोमुख नक्षत्रें. यांवर विहिरी, कूप, तळीं, पेवें आदिकरून खणावीं, ठेवणीं ठेवावीं अथवा काढावीं. द्यूत खेळावें. बिलप्रवेशादि करावीं व गणितारंभ करावा.

तिर्यङ्मुख नक्षत्रावर कोणतीं कर्मे करावीं.

ज्येष्ठादित्यकराश्विनीमृगशिरःपौष्णानुराधानिल स्त्वष्टाख्यानिवदंतिभानिमुनयास्तिर्यङ्मुखान्येषुच ॥ अश्वेभोष्ट्रलुलायरासभवृषोरंत्यादिदंत्यश्वनौमंत्रीयंत्र हलप्रवाहगमनारंभाःप्रसिद्ध्यंतिच ॥ ७७ ॥

अर्थः—ज्येष्ठा, पुनर्वसु, हस्त, अश्विनी, मृग, अनुराधा, स्वाती, चित्रा, हीं ७ नक्षत्रें. यांवर घोडे, नाना वाहनें, उंट, गाढव आदिकरून जनावरें यांचें पालन अधिकारपरत्वें करून आरोहण करावें. अनेक मंत्र चालवावे. नांगर धरावे. या प्रकारचीं कृत्यें या नक्षत्रांवर करावीं.

ऊर्ध्वमुखनक्षत्रांवर कोणतीं कृत्यें करावीं.

पुष्यार्द्राश्रवणोत्तराशतभिषक्ब्राह्मश्रविष्णवाह्वयान्यूर्ध्वास्यानिनवोदितानिमुनीभिर्धिष्ण्यान्यथैतेषुच प्रासादध्वजधर्मवारणगृहप्राकारसंतोरणछायारामहितोविधिर्हिनृपतेःपट्टाभिषेकादिच ॥ ७८ ॥

अर्थः—पुष्य, आर्द्रा, श्रवण, उत्तरा, शततारका, रोहिणी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, धनिष्ठा हीं ९ नक्षत्रें

उर्ध्वमुख, यांवर गुढिया, तोरणें, ध्वजापताकादि शिखरें, देवालयाचीं कामें, आराम, छायानिवास इत्यादि हितकारक कृत्यें व राज्याभिषेक वर सांगितलेल्या नक्षत्रांवर करावीं.

नष्टवस्तुप्रश्न.

तिथिवारंचनक्षत्रंलग्नंवह्निविमिश्रितम् ॥
पंचभिस्तुहरेद्भागंशेषंतत्त्वंविनिर्दिशेत् ॥ ७९ ॥
॥ फल ॥ पृथिव्यांतुस्थिरेज्ञेयअप्सुव्योमेनलभ्यते ॥ तेजस्तुराजसंज्ञेयंवायौशोकंविनिर्दिशेत् ॥ ८० ॥

अर्थः—तिथि, वार, नक्षत्रें हीं तीन एकत्र करून ५ नीं भागावें, शेष १ उरला तर पृथ्वींत आहे, २ उरले तर जळांत आहे, न लभते. ३ उरले तर आकाशीं आहे, न लभते. ४ उरले तर तेजराजानें नेली. ५ उरले तर वायूचे ठायीं वस्तु आहे, शोक सांगत्ये असें जाणावें.

गर्भिणीप्रश्न.

तत्पृच्छलग्नेरविजीवभौमेतृतीयसप्तेनवपंचमेच ॥ गर्भःपुमान्वैऋषिभिःप्रणीतंचान्यग्रहेस्त्रीषण्मासतैः प्रणीतम ॥ ८१ ॥

अर्थः—गर्भिणी स्त्री ज्या लग्नावर प्रश्न करील त्या लग्नीं ग्रह पहावे. लग्नापासून तृतीय, पंचम, सप्तम आणि नवम इतक्या स्थानीं रवि, गुरु, भौम हे ग्रह असले तर पुत्र होईल, आणि या स्थानीं अन्य असल्यास कन्या होईल.

मुष्टिप्रश्न.

मेषेरक्तंवृषेपीतंमिथुनेनीलवर्णकम् ॥ क-
र्केचपांडुरंज्ञेयंसिंहेधूम्रप्रकीर्तितम् ॥ ८२ ॥
कन्यायांनीलमिश्रंतुतुलायांपीतमिश्रितम् ॥
वृश्चिकेताम्रमिश्रंचचापेपीतंविनिश्चितम् ॥नक्रे-
कुंभेकृष्णवर्णंमीनेपीतंवदेत्सुधीः ॥ ८३ ॥

अर्थः—पृच्छकाचे मुष्टींत कोणते वर्णाची वस्तु आहे ती सांगावी. मेष लग्न असलें तर तांबडे वर्णाची वस्तु मुष्टींत आहे. वृषभ लग्न असलें तर पिंवळी. मिथुनीं निळी. कर्की पांढरी, सिंहीं धूम्रवर्णाची. कन्यालग्नीं नीलमिश्रित, वृश्चिकीं ताम्रमिश्रित, धनीं पीतमिश्रित, मकरीं कृष्णवर्ण, कुंभीं लोहमय, मीनीं पीतवर्णाची वस्तु आहे असें जाणावें.

प्रस्थानीं ठेवण्याच्या वस्तु वर्णपरत्वें.

यज्ञोपवीतकंशस्त्रंमधुंचस्थापयेत्फलम् ॥
विप्रादिःक्रमतःसर्वेस्वर्णधान्यांबरादिकम्॥८४॥

अर्थः—सुमुहूर्तावर गमन करण्याचा अभाव आहे तर प्रस्थान वस्तु ठेवणें, त्या वर्णपरत्वें सांगतों. ब्राह्मणांनीं यज्ञोपवीत, क्षत्रियांनीं शस्त्र, वैश्यांनीं मधु आणि शूद्रांनीं फळ, या क्रमानें जाणावें आणि सर्वांस धान्य व वस्त्र हीं उक्त होत.

प्रस्थान किती दिवस उपयोगीं पडतें तें.

**राजादशाहंपंचाहमन्यस्तुप्रस्थितोवसेत् ॥**
**अंगप्रस्थानसंपूर्णंवस्तुप्रस्थानकेऽर्धकम् ॥८५॥**

अर्थः—राजांनीं प्रस्थान ठेवल्यास १० दिवस व अन्यांस ५ दिवस तो मुहूर्त उपयोगीं पडतो. परंतु वस्तु प्रस्थानीं अर्धकाळ जाणावें आणि अंगप्रस्थान केल्यास संपूर्ण फळ प्राप्त होईल.

**गर्दभो वित्तहानी च, रत्नलाभस्तु वाजिना ॥**
**लक्ष्मीप्राप्तिर्गजारूढो, मेषे च मरणं ध्रुवम् ॥**

अर्थः—रासभ सामोरें आल्यास द्रव्यनाश, घोडा आल्यास रत्नादिलाभ, हत्ती आल्यास द्रव्यलाभ आणि मेंढा आला तर मरण जाणावें.

**चित्रास्वातीविशाखासु श्रावणे न च वर्षति ॥**
**सर्वरत्नानि संत्यज्य कर्तव्यो धान्यसंग्रहः ॥१॥**

अर्थः—चित्रा, स्वाती व विशाखा हीं नक्षत्रें व श्रावण महिना यांचे ठायीं जर पाऊस पडला नाहीं तर आपल्या

जवळची सर्व संपत्ति खर्च करून धान्यसंग्रह अवश्य करावा. कारण, त्या वर्षी खाचित दुष्काळ पडेल.

**आषाढादित्रिमासेषु शुक्लपक्षे तिथिक्षयः ॥**
**राज्यभंगे धान्यनाशोः ह्येतदुर्भिक्षलक्षणम्॥२॥**

अर्थः—आषाढ, श्रावण व भाद्रपद या तीन महिन्यांत शुक्ल पक्षांतील कोणत्याहि तिथीचा क्षय झाला असल्यास त्या वर्षी राज्यभंग व धान्य नाश होऊन सर्वत्र हाहाःकार होईल.

**प्रातःकाले तुषारश्च, मध्यान्हे मेघडंबरम् ॥**
**सायंकाले निरभ्रत्वं, ह्येतदुर्भिक्षलक्षणम् ॥ ३ ॥**

अर्थः—पाऊसकाळीं पहांटेस तुषारयुक्त पर्जन्य, मध्यरात्रीं नुसती मेघ गर्जना, संध्याकाळीं आकाश स्वच्छ; याप्रमाणें स्थिति असतां त्या वर्षी दुष्काळ पडेल असें समजावें.

समाप्त.

मुद्रक व प्रकाशकः—दत्तात्रय विश्वनाथ पाठक, जगदीश्वर प्रिं. प्रेस, गिरगांव, गायवाडी, मुंबई नं. ४.
आवृत्ति ७ वी. सन १९४५ ]        [ पुनर्मुद्रण सन १९५१